YF-25

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

विद्यार्थी विकास मंडळ

केंद्रीय लोककला महोत्सव २०२५-२६

# परिपत्रक

सर्व शैक्षणिक विभागातील विद्यार्थी/ विद्यार्थीनींना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ केंद्रीय लोककला महोत्सव दि. ११ ते १२ जानेवारी २०२६ या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामध्ये अयोजित करण्यात आला आहे.

केंद्रीय लोककला महोत्सवामध्ये आपल्या विद्यापीठाचा संघ सहभागी होणार असून ज्या विद्यार्थी/ विद्यार्थीनींना लोककला महोत्सवात सहभागी होण्याची इच्छा आहे. त्यांनी दि. १६ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता नाट्यशास्त्र विभाग येथे दहावीच्या सनतची छायांकित प्रतसह निवड चाचणी करिता उपस्थित राहवे.

विद्यापीठ प्रांगण
छत्रपती संभाजीनगर
संदर्भ क्र : सविवि/२०२५/30907-30957
दिनांक ११ डिसेंबर २०२५

संचालक
विद्यार्थी विकास मंडळ

प्रतिलिपी : सर्व शैक्षणिक विभागप्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, कृपया सदरील परिपत्रक आपल्या विभागाच्या सूचना फलकारव माहितीस्तव प्रसिध्दी द्यावी.

Lokkala Mahotsav-25

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

(नॅकद्वारे **A+**दर्जा)

**विद्यार्थी विकास**


संचालक (का.) : २४०३१३२
विद्यार्थी विकास : २४०३१३३
फॅक्स : (०२४०) २४०३१३४, २४०३१५०
तार : बामुसिटी
Web Site : www.bamu.ac.in
E-Mail : **dsw@bamu.ac.in**

**डॉ. कैलास अंभुरे**
संचालक,
विद्यार्थी विकास मंडळ
विद्यापीठ परिसर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००४ **(महाराष्ट्र)**
**मो. क्र. :** ७५८८१६५२२१


संदर्भ /संविवि/२०२५/30261-30747 दिनांक : ०८.१२.२०२५

प्रति,
**मा. प्राचार्य,**
सर्व संलग्नित महाविद्यालय,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
**छत्रपती संभाजीनगर.**

प्रति,
**मा. संचालक,**
उपपरिसर,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
**धाराशिव.**

**विषय : केंद्रीय लोककला महोत्सव २०२५-२६...**

**महोदय / महोदया,**

आपणास कळविण्यात आनंद होतो की, २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाचा केंद्रीय लोककला महोत्सव सोबतच्या नियमावलीमध्ये दिल्याप्रमाणे दि. ११ व १२ जानेवारी २०२६ या दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसरात आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवातील सहभागी विद्यार्थी, कलावंत, साथीदार व संघप्रमुखांच्या ऑनलाईन नोंदणीचा कालावधी दि. १० डिसेंबर ते २० डिसेंबर २०२५ असून ऑनलाईन नोंदणी करतांना लोककला महोत्सवाच्या अतंर्गत सादर होणाऱ्या सर्वच कलाप्रकारासाठी एकत्रित नोंदणी करावी. त्यानंतर प्रवेशिकेसोबत सर्व प्रपत्रे व आवश्यक कागदपत्र जोडून प्रवेशिकेची हार्ड कॉपी **दि. २६ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत विद्यार्थी विकास विभागामध्ये** प्रत्यक्ष जमा करावी. यानंतर कोणत्याही प्रवेशिका स्वीकारल्या जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

**केंद्रीय लोककला महोत्सवामध्ये महाविद्यालयांचा सहभाग ऐच्छिक आहे.**

**नोंदणीकरिता लिंक** : https://online.bamu.ac.in/unic/folkart

सदरील महोत्सव यशस्वी करण्यासाठी आपल्या सहकार्याची आवश्यकता आहे. आपण सर्वतोपरी सहकार्य कराल अशी खात्री आहे.

धन्यवाद,

सोबत: १) नियम व कलाप्रकारांची यादी
२) प्राचार्य/ संचालकाचे हमीपत्र

अंभुरे
**संचालक**
विद्यार्थी विकास मंडळ

**प्रतिलिपी**

१) मा. संचालक, युनिक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.
२) जनसंपर्क अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

नॅक 'अ+' दर्जा

## केंद्रीय लोककला महोत्सव २०२५-२०२६

## महत्त्वाचे नियम

- **केंद्रीय लोककला महोत्सवात महाविद्यालयांचा सहभाग ऐच्छिक आहे.**
- **प्रवेश शुल्क :**

लोककला महोत्सवामध्ये भाग घेण्यासाठी विद्यापीठाने कलाप्रकारनिहाय खालीलप्रमाणे शुल्क निर्धारित केले आहे.

| | | |
|---|---|---|
| **१. प्रत्येक सांघिक कलाप्रकार** | - | **रू. २००/-** |
| **२. प्रत्येक वैयक्तिक कलाप्रकार** | - | **रू. १००/-** |

महाविद्यालयास जेवढ्या स्पर्धांमध्ये संघ पाठवायचा आहे त्यानुसार प्रवेश शुल्काची रक्कम **कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर** यांना Online ट्रान्सफर करावी.

- प्रवेश शुल्काशिवाय कोणत्याही महाविद्यालयाच्या संघास स्पर्धेमध्ये भाग घेता येणार नाही.
- **लोककला महोत्सवाची नोंदणी केवळ आणि केवळ ऑनलाईन पद्धतीनेच** स्वीकारण्यात येणार आहे. नोंदणीकरिता लिंक https://online.bamu.ac.in/unic/folkart
- **महाविद्यालयाचा संलग्नीकरण आयडी (Affiliation ID) हाच युवक महोत्सव नोंदणीसाठीचा ID असेल.**
  जसे- Id: **EA05576**
- वरील लिंकवर जाऊन महाविद्यालयाच्या सांस्कृतिक समन्वयकांनी स्वत:ची माहिती भरावी. त्यानंतर पासवर्ड प्राप्त होईल. नंतर पुढील माहिती भरावी.
- **नोंदणी १० डिसेंबर २०२५ ते २० डिसेंबर २०२५ या कालावधीत सुरू असून दि. २० डिसेंबर २०२५ रोजी मध्यरात्री १२.०० वा. पर्यंत सुरू राहील**. यानंतर कोणत्याही प्रकारे नोंदणीस मुदतवाढ देण्यात येणार नाही.
- **ऑनलाईन भरलेले सर्व फॉर्म दि. २६ डिसेंबर २०२५ पर्यंत** विद्यार्थी विकास विभाग कार्यालयात **स्वाक्षरी व कागदपत्रांसह सादर करणे बंधनकारक** आहे.
- नोंदणी फॉर्मसोबतची **सर्व प्रपत्रे भरणे अनिवार्य** आहे.
- कला सादरीकरणासंदर्भातील शेवटी जोडलेले **हमीपत्र प्राचार्यांच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह** प्रत्यक्ष नोंदणीवेळी सादर करणे अनिवार्य आहे.

- **ऑनलाईन नोंदणीसाठी अत्यावश्यक कागदपत्रे व माहिती**
  - विद्यार्थ्याचा PRN क्रमांक.
  - विद्यार्थ्यांचे जन्मतारीख असलेले दहावी बोर्ड प्रमाणपत्र-सनद (SSC Certificate)

- विद्यार्थ्यांचे आधार कार्ड (Students Aadhar Card)
- शेवटच्या परीक्षेचे गुणपत्रक (Last Exam/Sem. Marks Memo)
- संघव्यवस्थापकांचे नाव, ओळखपत्र/ आधारकार्ड व अन्य माहिती
- विद्यार्थी व संघव्यवस्थापकांचे पासपोर्ट फोटो

## ➢ फॉर्मसोबत प्रत्यक्ष सादर करावयाची अत्यावश्यक कागदपत्रे

- ऑनलाईन भरलेल्या फॉर्मची प्रिंट व सर्व प्रपत्रे (प्राचार्यांच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह)
- ऑनलाईन शुल्क भरल्याची पावती -प्रिंट
- विद्यार्थ्याचे आधार कार्ड
- विद्यार्थ्यांचे जन्मतारीख असलेले दहावी बोर्ड प्रमाणपत्र-सनद (SSC Certificate)
- शेवटच्या परीक्षेचे गुणपत्रक (Last Exam/Sem. Marks Memo)
- प्राचार्यांचे कला सादरीकरणासंदर्भातील हमीपत्र
- संघव्यवस्थापकांचे ओळखपत्र/आधारकार्ड

## ➢ महाविद्यालयांसाठी अत्यावश्यक सूचना

१. केवळ आपल्या महाविद्यालयात प्रवेश असलेल्या विद्यार्थी कलावंतांची केंद्रीय लोककला महोत्सवात नोंदणी करावी.

२. याकरिता प्रत्येक विद्यार्थ्यांचे PRN क्रमांक काळजीपूर्वक द्यावेत.

३. लोकला महोत्सवात संलग्नित महाविद्यालयात प्रवेश नसलेल्या व्यावसायिक कलावंतांना सहभागी केल्याचे आढळून आल्यास कलाप्रकारांचे सादरीकरण बंद करून महाविद्यालयास आर्थिक दंड ठोठावून महाविद्यालयावर महोत्सवात बंदी घालण्यात येईल.

४. महाविद्यालयांनी विद्यापीठास विद्यार्थी कलावंतांची चुकीची, खोटी माहिती दिल्यास संबंधित महाविद्यालयावर **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा-२०१६ नुसार कठोर कारवाई करण्यात येईल.** प्रसंगी महाविद्यालयाने विद्यापीठास चुकीची माहिती देऊन फसवणूक केल्याप्रकरणात गुन्हा दाखल करण्यात येईल. असा निर्णय विद्यार्थी विकास मंडळाच्या सल्लागार समितीच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

५. संघाचे गैरवर्तन/ शिस्तभंग/ सहभागी नसलेल्या कलावंताद्वारे सादरीकरण केल्यास याची संपूर्ण जबाबदारी प्रथम संघप्रमुख/संघव्यवस्थापकांची आणि महाविद्यालयाच्या प्राचार्यांची असेल.

६. स्पर्धेचे **व्हिडिओ चित्रीकरण व YouTube द्वारे थेट प्रक्षेपण** करण्यात येणार असल्याने केवळ आपल्या महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांचीच आपल्या महाविद्यालयाअंतर्गत महोत्सवात नोंदणी करावी.

७. केंद्रीय लोककला महोत्सवात **सहभागी संघाच्या संपूर्ण अचूक माहितीची जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या सांस्कृतिक समन्वयकांसह प्राचार्यांची असेल.**

## ➢ स्पर्धकांची पात्रता

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या सर्व शैक्षणिक विभागातील तसेच सर्व संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना केंद्रीय लोककला महोत्सवामध्ये भाग घेता येईल.

- विद्यार्थी कलावंत हा महाविद्यालयाचा पूर्णवेळ विद्यार्थी असावा.
- स्पर्धकाचे वय दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी २५ वर्ष वा त्यापेक्षा कमी असावे. वय वर्ष २५ असल्यास स्पर्धक अपात्र ठरेल.
- **केवळ नियमित, पूर्णवेळ विद्यार्थी** जे किमान एका शैक्षणिक वर्षाच्या कालावधीच्या पदवी किंवा पदव्युतर पदवीमध्ये प्रवेश घेतलेले आहेत आणि ज्यांची परीक्षा विद्यापीठाद्वारे १२वी परीक्षा किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर घेतली जाते, तेच पात्र ठरतील. **अशा विद्यार्थ्यांचा PRN असणे अनिवार्य आहे.**
- विद्यार्थी कलावंतांनी खालील अटी पूर्ण करणे अनिवार्य आहे-
  - विद्यार्थ्याने संबंधित विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालय / घटक महाविद्यालय / मान्यताप्राप्त संस्था / शैक्षणिक विभागाच्या प्रथम प्रवेशासाठी पात्र ठरविणारी परीक्षा उत्तीर्ण केल्यापासून ७ वर्षांहून अधिक काळ गेला नसावा.
  - तसेच, विद्यार्थी आपल्या शैक्षणिक कार्यक्रमाच्या नियमित कालावधीपेक्षा **एक वर्ष जास्त** कालावधीसाठी सहभागी होऊ शकतात.

    **स्पष्टीकरण :**

    तीन वर्षांच्या शैक्षणिक पदवीस (उदा. बी.ए., बी.एस्सी., बी.कॉम.) शिकणारे विद्यार्थी चार वर्षे सहभागी होऊ शकतात, तर चार वर्षांच्या अभ्यासक्रमांचे (उदा. बी.ई., बी.टेक.) विद्यार्थी पाच वर्षे सहभागी होऊ शकतात.
- विद्यार्थी एका शैक्षणिक वर्षात एकापेक्षा अधिक महाविद्यालय/विभागांचे प्रतिनिधित्व करू शकत नाहीत.
- विद्यापीठ किंवा महाविद्यालयात तात्पुरता प्रवेश घेतलेला विद्यार्थी पात्र मानला जाणार नाही.
- विद्यार्थ्याने एका विभाग/महाविद्यालयातून दुसऱ्या विभाग/महाविद्यालयात स्थलांतर केल्यास, नवीन विभाग/महाविद्यालयात नियमित प्रवेश घेतल्यानंतरच तो पात्र मानला जाईल.

➢ **अपात्रता - पात्रतेचे नियम भंग केल्याबद्दल**

विद्यार्थ्याने पात्रतेच्या अटींचे उल्लंघन केल्यास, तो स्पर्धक तीन शैक्षणिक वर्षांसाठी (चालू शैक्षणिक वर्षासह) नैसर्गिकरीत्या अपात्र ठरेल.

**अत्यंत महत्त्वाचे : आपल्या सुरक्षेसाठी सर्व रंगमंच व भोजन व्यवस्थेच्या ठिकाणी CCTV कॅमेऱ्यांची व्यवस्था करण्यात आली आहे.**

## ➢ सामान्य मार्गदर्शक तत्त्वे व नियमावली

### १. संघाची क्षमता (Team Contingent)

- प्रत्येक महाविद्यालयातून संघातील विद्यार्थी कलावंतांची जास्तीत जास्त संख्या २० असेल.
- साथी कलाकार (Accompanists) शक्यतो विद्यार्थीच असावेत, ज्यांना सहभाग प्रमाणपत्र दिले जाईल.
- योग्य विद्यार्थी उपलब्ध नसल्यास साथी कलाकार म्हणून बाहेरच्या व्यक्तींना परवानगी आहे. मात्र त्यांना प्रमाणपत्र दिले जाणार नाही.

- **अतिरिक्त व्यक्ती आणण्याचे टाळावे.** कोणत्याही परिस्थितीत अतिरिक्त व्यक्तींना मान्यता दिली जाणार नाही. तसेच निवास व अन्य व्यवस्थादेखील केली जाणार नाही.
- **स्वरूप**

| विवरण | संख्या |
|---|---|
| विद्यार्थी कलावंत | २० |
| साथी कलाकार (विद्यार्थी किंवा व्यावसायिक) | ०५ |
| संघव्यवस्थापक (पुरूष) | ०१ |
| संघव्यवस्थापक (स्त्री) | ०१ |
| **एकूण** | **२७** |

## २. संघप्रमुख

- स्पर्धेत सहभागी होणाऱ्या महाविद्यालयाने **जास्तीत जास्त दोन व्यक्ती** संघप्रमुख/ संघ व्यवस्थापक म्हणून नियुक्त कराव्यात.
- संघप्रमुखांचे ओळखपत्र सोबत असावे.
- हे प्रमुख केंद्रीय लोककला महोत्सव आयोजन समितीसोबत समन्वय साधतील.
- संघाचे गैरवर्तन/ शिस्तभंग/ सहभागी नसलेल्या कलावंताद्वारे सादरीकरण केल्यास याची संपूर्ण जबाबदारी संघप्रमुख/संघव्यवस्थापकांची असेल. तसेच यासंदर्भाने **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा-२०१६ नुसार होणाऱ्या कारवाईस संघव्यवस्थापकांना सामोरे जावे लागेल.**
- संघातील विद्यार्थीनींसोबत महिला व्यवस्थापक/संघप्रमुख अनिवार्य आहे.
- **संघप्रमुखांनी पूर्णवेळ आपल्या संघासोबत विद्यापीठ परिसरात थांबणे** बंधनकारक आहे.

## ३. ओळखपत्र

प्रत्येक सहभागी विद्यार्थी कलावंतांकडे व संघप्रमुखांकडे संबंधित महाविद्यालयाच्या **प्राचार्यांनी सही केलेले फोटोसह ओळखपत्र** असणे आवश्यक आहे.

## ४. प्रवास आणि प्रवासादरम्यान अन्न खर्च

- **प्रवास खर्च** : सहभागी महाविद्यालयाने संघाचा महाविद्यालय ते विद्यापीठापर्यंतचा प्रवास खर्च स्वत: करावा.
- **अन्न खर्च** : प्रवासादरम्यान संघाचा नाश्ता व जेवणाचा खर्चदेखील सहभागी महाविद्यालयाने करावा.

## ५. भोजन व्यवस्था

विद्यापीठाकडून केंद्रीय लोककला महोत्सवाच्या पहिल्या दिवसापासून ते समारोप समारंभापर्यंत चहा, नाश्ता, भोजन उपलब्ध करून दिले जाईल. संघव्यवस्थापकांनी स्वत: पैसे भरून कुपन खरेदी करून जेवण घ्यावे. **किंवा** पुरवठादार/विक्रेत्यांकडून खाद्यान्नाचे विविध स्टॉल्स लावण्यात आलेले असतील तेथून संघाकरिता भोजन विकत घेता येईल.

## ६. निवास आणि भोजन

- महोत्सवाच्या कालावधीत विद्यार्थी कलावंत व संघप्रमुखांसाठी विद्यापीठ परिसरातील विद्यार्थी वसतिगृह, सामूहिक कक्ष, शैक्षणिक विभाग इत्यादी ठिकाणी **विनामूल्य निवासाची व्यवस्था** असेल. मात्र **निवास व्यवस्थेची गरज असणाऱ्या प्रत्येक संघाने नोंदणीच्या वेळी रु. ५००/-**

**रक्कम परतफेड योग्य अनामत रक्कम** म्हणून जमा करावी. दिलेल्या वस्तूंच्या नुकसानीसाठी किंवा मालमत्तेच्या नुकसानीसाठी ही रक्कम कपात केली जाईल.

- अंथरण्याकरिता सतरंज्या/मॅटची व्यवस्था विद्यापीठाकडून करण्यात येईल.

## ७. कपडे

सद्य:स्थितीतील थंडी लक्षात घेता, विद्यार्थी कलावंत व संघव्यवस्थापकांनी **गरम अंथरून-पांघरूण, ब्लँकेट्स, लोकरीचे कपडे, स्वेटर, अत्यावश्यक औषधी, कुलूप इत्यादी आवश्यक वस्तू** सोबत आणणे अनिवार्य आहे.

## ८. लसीकरण

सर्व सहभागी विद्यार्थी कलावंत आणि संघव्यवस्थापकांनी **कोविड, कॉलरा, टायफॉइड इत्यादी रोगांसाठी लसीकरण करून घेणे आवश्यक आहे.**

## ९. शिस्त

i. जर कोणत्याही संघाचे वर्तन केंद्रीय लोककला महोत्सवाच्या उद्दिष्ट वा नियमांच्या विरोधी आढळले, तर **विद्यापीठाद्वारे सदस्य/संघावर कठोर कारवाई करण्यात येईल**, तसेच **संबंधित व्यक्ती/संघाला तीन शैक्षणिक वर्षांसाठी अपात्र** ठरवले जाईल.

ii. **विवादास्पद विषयांवर** कोणत्याही संघप्रमुखांनी किंवा संघ सदस्यांनी विद्यापीठाची प्रतिमा मलीन होईल याप्रकारे **कृती करू नये.**

iii. मद्यपान, छेडछाड, परीक्षकांवर प्रभाव टाकणे, अयोग्य वर्तन **कठोरपणे निषिद्ध आहे.**

iv. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर **संघाला निलंबित करून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा-२०१६ नुसार कठोर कारवाई करण्यात येईल.**

v. संघातील शिस्त राखण्याची जबाबदारी संघप्रमुखांची असेल.

vi. कोणत्याही शिस्तभंगाच्या घटनेत, संघप्रमुखाने तात्काळ **संचालक, विद्यार्थी विकास** यांना माहिती द्यावी.

vii. गंभीर प्रकरणे **निरीक्षक समिती** आणि **कुलगुरू महोदयांच्या निदर्शनास आणली जातील.**

viii. सर्व सहभागी संघांनी विद्यापीठ प्रशासनाकडून दिलेल्या **सर्व सूचना काटेकोरपणे पाळणे बंधनकारक आहे.**

## १०. स्पर्धेसंबंधीचे इतर नियम

- प्रत्येक कलाप्रकार सादरीकरणापूर्वी दिलेली ओळखपत्रे रिपोर्टिंग प्रमुखांकडे जमा करणे अनिवार्य आहे.
- महोत्सवात फटाके किंवा शस्त्रास्त्रांचा वापर सक्तपणे प्रतिबंधित आहे. तथापि, सांस्कृतिक सादरीकरणासाठी आवश्यक असल्यास, आयोजक सचिवांची (संचालक, विद्यार्थी विकास) पूर्व परवानगी घेऊन त्यांची प्रतिकृती वापरता येईल.
- **विद्यापीठाने उपलब्ध करून दिलेल्या निवास व्यवस्थेचा वापर करणाऱ्या प्रत्येक संघाने नोंदणीच्या वेळी रु. ५००/- रक्कम परतफेड योग्य अनामत रक्कम** म्हणून जमा करावी. दिलेल्या वस्तूंच्या नुकसानीसाठी किंवा मालमत्तेच्या नुकसानीसाठी ही रक्कम कपात केली जाईल.
- महाविद्यालयातील विद्यार्थी कलावंत, संघातील सदस्यांनी गैरवर्तणूक केल्यास त्यांच्यावर, संघावर, महाविद्यालयावर **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा-२०१६** नुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

- स्पर्धेसाठी आवश्यक पोस्टर, साहित्य, संगीत, वाद्ये, इ. साहित्य, विद्यार्थी कलावंत/संघाने सोबत आणावे.
- प्रत्येक कलाप्रकारात प्रथम, द्वितीय व तृतीय अशी तीन पारितोषिके देण्यात येतील.
- परीक्षकांनी दिलेले निर्णय अंतिम असून सर्व स्पर्धकांवर, संघावर ते बंधनकारक राहतील.
- स्पर्धेच्या ठिकाणी स्पर्धेसाठी रिपोर्टिंग, रिपोर्टिंगची घोषणा झाल्याच्या १० ते १५ मिनिटांत करावे आणि आपला सादरीकरणाचा क्रमांक आयोजन समितीकडून घेऊन आपली कला सादर करावी.
- **तीन वेळा संघाचा क्रमांक घोषित करण्यात येईल, तिसऱ्या कॉलनंतर संघ बाद करण्यात येईल.** किंवा संघाला सादरीकरणासाठी आयोजन समितीची स्वतंत्र परवानगी घ्यावी लागेल, अन्यथा तो त्या संघास सदरील कलाप्रकारात सादरीकरण करता येणार नाही.

## ११. कला प्रकार

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाद्वारे केंद्रीय लोककला महोत्सवामध्ये महाराष्ट्राच्या लोककला आणि संगीत व साहित्य अंतर्गत **११ कलाप्रकारांत स्पर्धा** आयोजित केल्या आहेत-

### महाराष्ट्राच्या लोककला _ Folk Art of Maharashtra

१. गोंधळ (सांघिक)_Gondhal (Group)
२. पोवाडा (सांघिक)_ Powada (Group)
३. भजन (सांघिक)_ Bhajan (Group)
४. भारूड (सांघिक)_Bharud (Group)
५. लावणी (वैयक्तिक/सांघिक)_ Lavani (Individual/Group)
६. लोकगीत (सांघिक)_ Folk Song (Group)
७. लोकनाट्य (सांघिक)_ Folk Drama (Group)
८. वासुदेव (वैयक्तिक)_Vasudev (Individual)
याशिवाय,
९. कव्वाली (सांघिक)_ Qawaali (Group)
१०.जलसा (सांघिक)_ (Jalsa (Group)
११.कविता वाचन (वैयक्तिक)_Poetry Reading (Individual)

## १२.स्पर्धा संचालन नियम

### महाराष्ट्राच्या लोककला

महाराष्ट्रातील प्रादेशिक किंवा बोली भाषेतच कला सादर करता येईल. लोककलेतील सर्व स्पर्धेच्या सादकरीकरणाकरिता पाश्चात्य वाद्यांचा उपयोग करता येणार नाही. त्याकरिता खालील पारंपरिक वाद्ये वापरता येतील.

**वाद्ये-** पखवाज, दिमडी, संबळ, हलगी, चंडी, ढोलकी, डफ, ताशा, कच्ची, डमरु, पायपेटी, हार्मोनियम, सनई, बासरी, शिंग, सुन्द्री, पिपाणी, तुनतुणे, विणा, एकतारी, टाळ, चिपळ्या, खंजिरी, खुळखुळा, घंटी, कडी, झांज, घुंगरु, तबला, टिंगरी, सारंगी, मृदंग इत्यादी.

#### i. गोंधळ (सांघिक स्पर्धा)

घरातील मंगल कार्य निर्विघ्न पार पाडल्याबद्दल देवीची आराधना, स्तुती आणि पूजा करुन तिच्या उपकार स्तवनाचा विधी म्हणजेच गोंधळ तुळजाभवानी रेणुकादेवी, अंबाबाई या कुलदेवतांच्या नावाने गोंधळ घालण्याचा

विधी महाराष्ट्रामध्ये प्रचलित आहे. यामध्ये देवीचा चमत्कार व देवस्थानचे वर्णन असलेल्या कथा तसेच स्तुती, नमन असते.

१. कथा निरुपण करणारा सादरकर्ता **एक मुख्य गोंधळी** असावा आणि व्यासपीठावर एकूण **३ ते ६ साथी कलावंत** असावेत.
२. सुरुवातीला देवीची पारंपरिक पद्धतीने पूजा करावी. त्यासाठी देवीचा चौक, पूजेचे साहित्य व नैवैद्य इत्यादी असावे.
३. पूजा, गण, देवीदेवतांना आवाहन, पारंपरिक गोंधळ, पऊड व शेवटी देवीची आरती असा सादरीकरण क्रम असावा.
४. गोंधळ मुख्य गायकाने गायन करुन सादर करावा. शक्य झाल्यास संबळ वाजवून सादर करावा.
५. **साथीदार कलावंत केवळ ३** असावेत.
६. सादरीकरण **कालावधी ६** ते **८ मिनिटे** असेल.
७. मंच/वाद्य व ध्वनिव्यवस्था करण्यासाठी जास्तीत जास्त ०३ मिनिटे दिली जातील.
८. नृत्याला अधिक महत्त्व देऊ नये.
९. गोंधळाच्या नाट्यात स्त्रीचा सहभाग नसतो.
१०. **स्वरूप :** ज्वारीची किंवा ऊसाची पाच ताटे बांधून मध्ये लाल कपडा अंथरुन धान्याने गादी भरतात. पाण्याने भरलेला तांब्या, पाच किंवा सात नागवेलीची पाने उलटी ठेवून मध्ये नारळ ठेवतात. धान्याच्या गादीवर घट ठेवून देवीचा टाक मांडतात. समोर विड्याची पाच पाने मांडून त्यावर खारीक, खोबरे, सुपारी, पैसा ठेवून धूप किंवा उदबत्ती लावतात. घटावर ऊसांच्या किंवा ज्वारीच्या तिटरणीला पुऱ्या, करंज्या व फुलांच्या माळा बांधतात.
११. गोंधळ्याच्या अंगात मखमली अंगरखे अथवा बारबंदी, गळ्यात कवड्याच्या माळा, डोक्यात कनगीदार पगड्या, गळ्यात देवीचा टाक, पायात घुंगरु, डोक्यावरती कवड्यांची टोपी, परडी व पोत किंवा दिवटी इत्यादी उपयुक्त साहित्य असावे.
१२. परडी, संबळ, तुणतुणे, दिमडी, डफ, झांज, अपवादात्मक ढोलकी, हार्मोनियम इत्यादी वाद्ये असावी.
१३. मूल्यांकन प्राधान्याने **मांडणी/रचना, संगीत, वेशभुषा/ रंगभुषा, सादरीकरण** आणि **एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

**ii. पोवाडा (सांघिक स्पर्धा)**

शिवाजी महाराजांच्या काळी शाहिरांनी कवणांचा एक नवीन प्रकार प्रचारात आणला. हा प्रकार म्हणजेच पोवाडा. वीर रसाने ओतप्रोत भरलेल्या पोवाड्यातून थकल्या-भागल्या माणसांचे मनोरंजन व्हायचे व स्फूर्ती यायची.

१. पोवाड्याचा विषय ऐतिहासिक वा ऐतिहासिक घटनांचे वर्णन, वीर स्त्री-पुरुषांच्या शौर्याचे, महापुरुष व स्वातंत्र्यसेनानी यांच्या कार्याचे वर्णन असावे.
२. पोवड्याचे **गायन मुख्य शाहीराने करावे**. शाहीर पुरुष अथवा स्त्री असू शकते.
३. **सहभागी कलावंत ३ ते ६ असावेत** आणि **साथीदार कलावंत ३ असावेत.**
४. सादरीकरणासाठी **वेळ ०८** ते **१० मिनिटे** असेल.
५. मंच/वाद्य व ध्वनिव्यवस्था करण्यासाठी जास्तीत जास्त **०३ मिनिटे** दिली जातील.
६. पाठीमागे विविध वाद्ये वाजवून मुख्य शाहीराच्या गाण्याची साथ करणारे तीन ते सहा झिलकरी असावेत.
७. झिलकरी साथीदारांमध्ये पुरुष किंवा स्त्री वा स्त्री-पुरुष असू शकतील.

८. गायन मर्दानी, सुरेल, ताल व लयबद्ध असावे.
९. पोवाडा केवळ पद्यात्मक (कवणे) असू नये, तर त्यामध्ये कथानकाचा भाग असावा.
१०. आवाजातील चढउताराबरोबरच वीर, करुण, शांत या रसांसह अन्य रसांची निर्मिती व्हावी.
११. डोक्यावर फेटा, बाराबंदी, अंगरखा/ नेहरु शर्ट, धोतर, पायजमा, जॅकेट, पगडी व शेला असा पुरुषाचा आणि सादरकर्ती स्त्री कलाकार असेल तर नऊवारी साडी असा पोषाख असावा.
१२. सादरीकरणासाठी मुख्य शाहिराच्या हातात डफ, इतरांच्या हातात दिमडी, शिंग, झांज, टाळ, कडी, तुणतुणे, खंजिरी, चंडी यासारखी वाद्ये असावीत.
१३. मूल्यांकन प्राधान्याने **मांडणी/रचना, संगीत, वेशभुषा/ रंगभुषा, सादरीकरण** आणि **एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

### iii. भजन (सांघिक स्पर्धा)

थकल्या-भागल्या वारकऱ्यांना ईश्वर भक्तीत रममान होण्यासाठी निखळ आनंद प्राप्तीसाठी किंवा आध्यात्माचा प्रचार व्हावा यासाठी संतानी महाराष्ट्रात भजनाची सुरुवात केली.

१. भजनाचा **विषय अध्यात्म, तत्त्वज्ञानात्मक उपदेश** असावा.
२. **सादरीकरणात** सुरुवातीला विठ्ठलाचा जयघोष व्हावा. त्यानंतर जय-जय राम कृष्ण हरीचा गजर व्हावा. नंतर संतांचा एखादा अंभग सादर करावा.
३. पुरुष अथवा स्त्रियांना भजन सादर करता येईल.
४. **मुख्य गायक अथवा गायिका १** असेल. साथीदार कलावंत **२ ते ५** असतील.
५. मंचावर **एकूण ३ ते ६ स्पर्धक कलावंत** असावेत.
६. सादरीकरण **वेळ** ४ ते ५ **मिनिटे** असेल.
७. मंच/वाद्य व ध्वनिव्यवस्था करण्यासाठी जास्तीत जास्त ०३ मिनिटे दिली जातील.
८. यामध्ये रागदरबारीयुक्त आलाप व तानांचा वापर करता येईल.
९. नेहरु शर्ट, धोतर, डोक्यावर पागोटे, गळयात तुळसीच्या माळा, मुलींसाठी नऊवारी साडी अशी वेशभूषा असावी.
१०. टाळ, एकतारी, विणा, चिपळया, पखवाज, तंबोरा, हार्मोनिअम इत्यादी वाद्ये वापरावी.

मूल्यांकन प्राधान्याने **मांडणी/रचना, संगीत, वेशभुषा/ रंगभुषा, सादरीकरण** आणि **एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

### iv. भारुड (सांघिक स्पर्धा)

संत एकनाथ महाराजांनी समाज प्रबोधनासाठी व षडविकारांवर आसूड ओढण्यासाठी भारुडाची सुरुवात केली.

१. भारूडाद्वारे अंधश्रद्धा निर्मुलन, पर्यावरण, भ्रष्टाचार, लोकसंख्या वाढ, स्त्रीभ्रूण हत्या इत्यादीसंदर्भात जनजागृती व समाज प्रबोधन व्हावे.
२. कलावंतांची संख्या **३ ते ६** असेल.
३. साथीदार कलावंत **३** असतील.
४. सादरीकरण **वेळ ०६** ते **०८ मिनिटे** असेल.
५. मंच/वाद्य व ध्वनिव्यवस्था करण्यासाठी जास्तीत जास्त ०३ मिनिटे दिली जातील.
६. भारुडात **एक मुख्य गायक** (निरुपणकार) व इतर दोन ते तीन सहगायक म्हणून घेता येतील.
७. पुरुष किंवा स्त्रियांना भारुड सादर करता येईल.

८. भारूडामध्ये संतांची एखादी रचना असावी. त्यावरून विविध दृष्टांत देऊन निरूपण करावे.
९. विठ्ठलाचा जयघोष करत पावली खेळत स्पर्धक कलावंतांचा रंगमंचावर प्रवेश व्हावा.
१०. प्रतिकात्मक भूमिकांमधून रुपात्मक पद्धतीने तत्त्वज्ञानाची मांडणी करावी.
११. गायन सुरेल व तालबद्ध व्हावे.
१२. अभिनय व नाट्यीकरणातून सादरीकरणे व्हावे.
१३. भारुडाद्वारे कोणाचीही निंदा, नालस्ती, बदनामी करू नये.
१४. सादरकर्त्या कलावंताचा पोषाख हा नेहरु शर्ट, पगडी, फेटा, गांधी टोपी, धोतर, पायजमा, गळ्यात उपरणे, कमरेला शेला, कपाळावर अष्टगंध, बुक्का असावा.
१५. सादरीकरणात टाळ, चिपळ्या, पखवाज, तबला, पेटी, अपवादात्मक ढोलकी या वाद्यांचा अवलंब करता येईल.
१६. मूल्यांकन प्राधान्याने **मांडणी/रचना, संगीत, वेशभुषा/ रंगभुषा, सादरीकरण** आणि **एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

### v. लावणी (वैयक्तिक/ सांघिक स्पर्धा)

१. लावणीचा **वेळ ४ ते ८ मिनिटे** असेल.
२. सूचना घंटा (वॉर्निंग बेल) सहाव्या मिनिटाला होईल.
३. लावणीत **स्पर्धक संख्या कमीत कमी १** आणि **जास्तीत जास्त ६** असतील.
४. एकपेक्षा जास्त किंवा ६ पर्यंत विद्यार्थी कलावंत सहभागी होत असतील तर हा कलाप्रकार सांघिक गृहीत धरून गुणांकन केले जाईल.
५. लावणीला वादक **साथीदार संख्या ३ ते ५** असेल.
६. लावणीमध्ये मुले-मुली किंवा केवळ मुली किंवा केवळ मुले सादरीकरण करू शकतात.
७. सादरीकरणात अश्लील हावभाव, उत्तानपणा असू नये.
८. सादरीकरणाच्या सुरुवातीला वाद्याची जगुलबंदी, मुजरा अपेक्षित आहे.
९. वेशभूषेमध्ये नऊवारी साडी, शक्य असल्यास बांधणीची किंवा शिवलेली साडी असावी.
१०. लावणी स्त्री किंवा पुरुष गाऊ शकतात.
११. लावणी भेदीक (सवाल-जवाब), श्रृंगारिक (फडावरची लावणी, बैठकीची लावणी), शाहिरी, छक्कड लावणी (स्थळांचा महिमा सांगणारी लावणी) या कोणत्याही एका प्रकारामधून सादरीकरण करता येईल.
१२. **रेकॉर्डवर (ध्वनिमुद्रित) लावणी सादर करता येणार नाही.**
१३. लावणीमध्ये ढोलकी, पेटी, तुणतुणे, खंजेरी, कडी, टाळ, घुंगरु, पायपेटी, डफ, बासरी आदी पांरपरिक भारतीय वाद्यांचा वापर करता येईल.
१४. लावणी स्पर्धेच्या सादरीकरणाकरिता पाश्चात्य वाद्यांचा वापर करता येणार नाही.
१५. लावणी ही मराठी भाषेतच असावी.
१६. मूल्यांकन प्राधान्याने **संगीत, अभिनय, वेशभुषा व रंगभुषा, सादरीकरण** आणि **एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

### vi. लोकगीत (सांघिक स्पर्धा)

**पार्श्वभूमी :** लोकांनी लोकांसाठी गायलेले गीत म्हणजे लोकगीत होय. सण, उत्सव, समारंभ, विविध संस्कारप्रसंगी ग्रामीण भाषेत लोकगीत गायले जाते.

१. लोकगीताचे विषय ग्रामीण जीवन, सण-उत्सवाचे वर्णन, संस्कार, आशा-निराशा, सुख-दुःख इत्यादी असावे.
२. यामध्ये ओवी, पाळणा, धनगरी गीते, आराधीगीते, विवाहगीते, भूलई, उखाणे, शेतकरी गीते, गण-गवळण, भूपाळी, निसर्ग गीते सादर करता येतील.
३. लोकगीत ग्रामीण अथवा बोली भाषेत असावे.
४. **३ ते ६ स्पर्धक** कलावंतांना सहभागी होता येईल आणि **३ साथीदार** असावेत.
५. मुले, मुली अथवा मुला-मुलींचा संघ असेल.
६. सादरीकरण **वेळ** ४ ते ५ **मिनिटे** असेल.
७. मंच/वाद्य व ध्वनिव्यवस्था करण्यासाठी जास्तीत जास्त ०३ मिनिटे दिली जातील.
८. त्या-त्या लोकगीतानुसार पारंपरिक वेशभुषा असावी.
९. लोकगीताला अनुसरुन पारंपरिक वाद्ये असावीत.
१०.नृत्याला महत्त्व असू नये.
११.मूल्यांकन प्राधान्याने **गीताची निवड, स्वररचना, संगीत, सादरीकरण** आणि **एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

## vii. लोकनाट्य (सांघिक स्पर्धा)

लोकनाट्य हा पारंपरिक कलाप्रकार असून त्याची शैली ही लोकयमी आहे. म्हणजेच लोकांनी केलेले नाट्य. म्हणजेच लोकनाट्य होय. याचा मूळ उद्देश हा लोकरंजनातून समाजप्रबोधन हा आहे.

१. **स्पर्धक कलावंत संख्या ६ ते ८** असावी आणि **साथीदार ३ ते ५** असावेत.
२. सादरीकरण **वेळ १० ते ३० मिनिटे** असेल.
३. मंच/वाद्य व ध्वनिव्यवस्था करण्यासाठी जास्तीत जास्त ०३ मिनिटे दिली जातील.
४. गण, गवळण, लावणी, बतावणी, वग व भैरवी हे पारंपरिक असावे.
५. लोकनाट्य हे सामाजिक, राजकीय, कौटुंबिक व विनोदी असावे.
६. लोकनाट्य संहिता/सारांश चार प्रतीत सादर करावा.
७. सादरीकरणातून अस्सल गावराण रांगडेपणा, विनोद निर्मिती, परिस्थितीवर व्यंग्यात्मक ताशेरे असावेत. मात्र जलसा या कलाप्रकाराच्या **सादरीकरणात कोणत्याही धर्माच्या देवदेवता, राष्ट्रीय पुरूष यांचा अवमान होणार नाही व सामाजिक ऐक्य व एकात्मता यांना बाधा येणार नाही. कोणत्याही समाज घटकांच्या भावना दुखावल्या जाणार नाहीत, अशी दक्षता** संहिता सादरीकरणात घेणे बंधनकारक आहे.
८. संवाद अस्सल ग्रामीण बोलीभाषेतून असावेत.
९. सादरकीरणात ढोलकी, डफ, पेटी, टाळ, तुणतुणे इत्यादी पारंपरिक वाद्ये असावीत.

मूल्यांकन प्राधान्याने **मध्यवर्ती कल्पना, अभिनय, वेशभुषा व रंगभुषा, सादरीकरण** आणि **एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

## viii. वासुदेव (वैयक्तिक स्पर्धा)

पूर्वी श्रीकृष्णाचे रुप घेऊन पहाटेच्या पारी वासुदेव यायचा, गाणी म्हणायचा व भिक्षा मागायचा, जीवनविषयक तत्त्वज्ञान आणि दानाचं महत्त्व सांगायचा.

१. सादरीकरणात गायनासह प्रभावी संवाद साधणे, ठरावीक लयीत गिरक्या घेणे, हातातील टाळ व चिपळ्या लयबद्ध वाजवून सुरेल गायन करणे आवश्यक असेल.
२. दान दिल्यानंतर विलक्षण गतीने नाचत दान पावल्याची पावती देणे, जाताना वाडवडिलांचे नाव विचारणे, त्यांचा व पितरांचा नामोल्लेख करुन सर्व देवतांना दान पावले करणे, एखादी गिरकी घेऊन पावा वाजवत पुढल्या दारी जाणे या कृती अपेक्षित.
३. वासुदेव सादर करणारा **कलावंत केवळ १** असेल; एकही साथी कलावंत घेता येणार नाही.
४. सादरीकरण **वेळ** ४ ते **५ मिनिटे** असेल.
५. मंच/वाद्य व ध्वनिव्यवस्था करण्यासाठी जास्तीत जास्त ०२ मिनिटे दिली जातील.
६. डोक्यावर मोराची उंच निमुळती होत गेलेली मुकुटाकार टोपी, अंगात घोळदार अंगरखा, गळ्यात पुढे दोन्ही बाजूला सोडलेला शेला, काखेत झोळी, कमरेला खोचलेला पावा व जुना कोट, कपाळी व कानाला चंदनाचा टिळा अशी वेशभूषा असावी.
७. सादरीकरणात टाळ, चिपळी, पावा, पायामध्ये घुंगरु यासारखी वाद्ये उपयोजावीत.
८. मूल्यांकन प्राधान्याने **मांडणी/रचना, संगीत, वेशभुषा/ रंगभुषा, सादरीकरण** आणि **एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

याशिवाय,

### ix. कव्वाली (सांघिक स्पर्धा)

(कव्वाली ही एक सूफी इस्लामिक भक्ती संगीताची कला आहे, जी हिंदुस्तानात उदयास आली. सुरुवातीला कव्वाली ही हिंदुस्तानातील सूफी दर्गे किंवा धार्मिक स्थळांवर सादर केली जात असे. कव्वालीच्या पारंपरिक सादरीकरण शैलीत मुख्य गायक, कोरस आणि ढोलक, तबला, सतार यांसारख्या वाद्यांच्या साथीचा समावेश असतो. कव्वाली केवळ संगीत नसून, ती सूफी विचारधारेचे भावनिक आणि आध्यात्मिक दर्शन घडवणारी एक प्रभावी कला आहे.)

१. प्रत्येक महाविद्यालयातील **४ ते ६ विद्यार्थ्यांचा** (पुरुष, महिला किंवा संमिश्र) एक संघ असेल.
२. कव्वाली ही **राष्ट्रीय एकात्मता आणि सामुदायिक सौहार्द** यावर आधारित असावी. दोन रचनांपैकी एक रचना या थीमवर असणे आवश्यक आहे.
३. यामध्ये मुख्य **गायक आणि कोरस सादरीकरण करू शकतात**, तर **ढोलक, तबला, सतार** यांसारख्या वाद्यांच्या साथीने संगीत देता येईल.
४. जास्तीत जास्त **तीन साथसंगतकारांना** परवानगी असेल.
५. सादरीकरणासाठी **८ ते १० मिनिटे** वेळ दिला जाईल.
६. संघाने **स्वत: स्वत:ची वाद्ये सोबत आणणे** आवश्यक आहे.
७. सादरीकरणापूर्वी **वाद्य व्यवस्था/ध्वनी व्यवस्था** करण्यासाठी अतिरिक्त **३ मिनिटे** दिली जातील.
८. कव्वाली मराठी/हिंदी वा दोन्ही भाषेतून सादर करता येईल.
९. मूल्यांकन प्राधान्याने **कव्वालीची निवड, स्वरचनेचे नावीन्य, वेशभुषा, सांघिक एकता व सादरीकरण** यावर आधारित असेल.

### x. जलसा (सांघिक स्पर्धा)

**प्रबोधनात्मक जलसांचे स्वरूप-**

**अ) सत्यशोधकी जलसा**

महात्मा फुले यांच्या विचार आणि कार्याचे स्वरूप व आशय केंद्रस्थानी ठेवून सत्यशोधकी जलसांची निर्मिती असावी. पूर्वी सदरील प्रकारास लिखित संहितेचे बंधन नव्हते. मात्र स्पर्धेतील सादरीकरणासाठी वर्तमान स्थिती लक्षात घेता मुक्त सादरीकरण शक्य नाही. त्यामुळे **संहिता लिखित असावी**. सोबत **महाविद्यालयांच्या प्राचार्यांचे परिनिरीक्षण प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे**.

**ब) आंबेडकरी जलसा**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचे व विचारांचे स्वरूप व आशय केंद्रस्थानी ठेवून संहिता निर्मिती असावी. पूर्वी सदरील प्रकारास लिखित संहितेचे बंधन नव्हते. मात्र स्पर्धेतील सादरीकरणासाठी वर्तमान स्थिती लक्षात घेता मुक्त सादरीकरण शक्य नाही. त्यामुळे **संहिता लिखित असावी**. सोबत **महाविद्यालयांच्या प्राचार्यांचे परिनिरीक्षण प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.**

**जलसा सादरीकरण :**

जलस्याचे वरील दोन्ही प्रकार म्हणजे महाराष्ट्रातील लोकप्रिय तमाशा या लोककला प्रकाराचे परिष्कृत रूप आहे. काळानुसार व परिस्थितीनुसार परिवर्तन करून आंबेडकरी जलसाकारांनी मूळ तमाशातील गण/नमन वगळून त्याऐवजी डॉ. आंबेडकरांना वंदन करून सादरीकरणाची सुरुवात केली. सत्यशोधकी जलसाकारांनी तमाशातील गवळणीला फाटा देऊन थट्टा-मस्करी टाळली. येथेही तेच अपेक्षित आहे. गवळणी ऐवजी जलसामध्ये सोंगाड्या या पारंपरिक विदुषकी पात्राच्या साह्याने सूत्रधार आपल्या साथीदारांसोबत गीत, नृत्य, नाट्य, सामाजिक प्रबोधनपर जलसे सादर करतो. एकापरीने हा लोकतत्त्वांचा समाजप्रबोधनात्मक आविष्कारच असतो, असे म्हणायला हरकत नाही.

| **जलसा या कलाप्रकाराचे सादरीकरण - वेळ विभागणी** | |
|---|---|
| पूर्वतयारी | ५ मि. |
| | |
| **सत्यशोधक जलसा** | **१५ मि.** |
| वंदनगीत | ३ मि. |
| म. फुलेंचे कार्य आणि विचारावर आधारित गीत, कविता, अखंड | ३ मि. |
| सवाल-जवाब, फार्स किंवा प्रहसन | ९ मि. |
| | |
| **आंबेडकरी जलसा** | **१५ मि.** |
| भीमवंदना | ३ मि. |
| डॉ. आंबेडकरांच्या कार्य व विचारावर आधारित गीतकाव्य | ३ मि. |
| सवाल-जवाब, प्रहसन किंवा फार्स | ९ मि. |

१. प्रत्येक महाविद्यालयातून ४ ते **६ विद्यार्थ्यांचा** (पुरुष, महिला किंवा संमिश्र) एक संघ सहभागी असेल.
२. संघाबरोबर वादक **साथीदारांची जास्तीत जास्त संख्या ३** असेल.
३. सादरीकरणाची **वेळ १२ ते १५ मिनिटे** असेल.
४. **पूर्वतयारीसाठी स्वतंत्र ५ मिनिटांचा कालावधी** असेल.
५. या कलाप्रकारासाठी **इलेक्ट्रॉनिक वाद्यांचा वापर करता येणार नाही**.
६. या कलाप्रकाराच्या **सादरीकरणातून निखळ मनोरंजन, प्रबोधन आणि लोकशिक्षण** अपेक्षित आहे.

७. जलसा या कलाप्रकाराच्या **सादरीकरणात कोणत्याही धर्माच्या देवदेवता, राष्ट्रीय पुरूष यांचा अवमान होणार नाही व सामाजिक ऐक्य व एकात्मता यांना बाधा येणार नाही.** तसेच **कोणत्याही समाज घटकांच्या भावना दुखावल्या जाणार नाहीत, अशी दक्षता** संहिता सादरीकरणात घेणे बंधनकारक आहे.
८. सादरीकरणात **अश्लीलता व उत्थानपणा असू नये.**
९. मूल्यांकन प्राधान्याने **विषय, संगीत, वंदनगीत, विचार आणि कार्य, सवाल-जवाब, प्रहसन/कार्य, समन्वय, वैविध्यावर, सादरीकरण** आणि **परिणामकारकता** यावर आधारित असेल.

### xi. कविता वाचन (वैयक्तिक स्पर्धा)

१. प्रत्येक सहभागी महाविद्यालयातून **फक्त १ विद्यार्थी/विद्यार्थीनी** या स्पर्धेत सहभागी होईल.
२. कविता **मराठी/ हिंदी/ इंग्रजी** भाषेत असावी.
३. सादरीकरणाची वेळ **४ ते ५ मिनिटे** असेल. वेळ गणना आयोजकांच्या अंतिम घोषणेनंतर सुरू होईल.
४. **कविता स्वलिखित असावी**; वाङ्मय चौर्य, चॅट बोट/एआय वरील कविता असल्यास सदरील स्पर्धकास बाद करण्यात येईल.
५. कविता सादर करण्यापूर्वी स्व हस्ताक्षरातील कविता चार प्रतीत युवक महोत्सव आयोजन समितीकडे जमा करणे बंधनकारक आहे.
६. मूल्यांकन प्राधान्याने **कवितेचा विषय, अभिव्यक्ती, सादरीकरण, भाषा आणि एकूण प्रभाव** यावर आधारित असेल.

## १४. कलाप्रकार सारांश

| विभाग | कार्यक्रम | सहभागी कलावंत संख्या | साथी कलावंत-कमाल संख्या | मंच / वाद्य / प्रकाश व्यवस्था - कमाल वेळ मि. | सादरीकरणाची वेळ (किमान-कमाल) मिनिटे |
|---|---|---|---|---|---|
| **महाराष्ट्राच्या लोककला** | | | | | |
| | गोंधळ (सांघिक) | ०३-०६ | ०३ | ०३ | ०६ - ०८ |
| | पोवाडा (सांघिक) | ०३ - ०६ | ०३ | ०३ | ०८ - १० |
| | भजन (सांघिक) | ०३-०६ | ०३ | ०३ | ०४ - ०५ |
| | भारूड (सांघिक) | ०३-०६ | ०३ | ०३ | ०६ - ०८ |
| | लावणी (वैयक्तिक/सांघिक) | ०१/ ०२-०६ | ०३-०५ | ०३ | ०४ - ०८ |
| | लोकगीत (सांघिक) | ०३ - ०६ | ०३ | ०३ | ०४ - ०५ |
| | लोकनाट्य (सांघिक) | ०३ - ०८ | ०३-०५ | ०३ | १० - ३० |
| | वासुदेव (वैयक्तिक) | ०१ | -- | ०२ | ०४ - ०५ |
| याशिवाय, | | | | | |
| | कव्वाली (सांघिक) | ०४ - ०६ | ०३ | ०३ | ०८ - १० |
| | जलसा (सांघिक) | ०४ - ०६ | ०३ | ०३ | १२ - १५ |
| | कविता वाचन (वैयक्तिक) | ०१ | -- | -- | ०४ - ०५ |

### पारितोषिक/फिरते चषक

विद्यापीठाद्वारे स्मृतिचिन्ह प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक संपादन करणाऱ्या विद्यार्थी कलावंतांना सन्मानचिन्ह प्रदान केले जाईल.

१. कलाप्रकारनिहाय वैयक्तिक स्पर्धांसाठी (Solo/Individual) विद्यार्थी कलावंतांना आणि समूह (Group) स्पर्धांसाठी संघाला सन्मानचिन्ह प्रदान केले जाईल.
२. **कै. प्रा. (डॉ.) संजय माणिकराव नवले** यांच्या स्मृती प्रीत्यर्थ **महाराष्ट्राच्या लोककला गटातील सर्वोत्कृष्ट संघासाठी फिरते चषक** (डॉ. अरविंद माणिकराव नवले, उदगीर, लातूर यांच्याकडून) प्रदान केले जाईल.

### कै. प्रा. (डॉ.) संजय माणिकराव नवले फिरते चषक विजेते

१. २०२४-२०२५ : देवगिरी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

### फिरते चषक (Rotating Trophies)

१. गतविजेत्या महाविद्यालयाने फिरते चषक विद्यापीठाकडे पुढील लोककला महोत्सवापूर्वी जमा करावे.
२. जर सलग तीन वर्ष एखाद्या महाविद्यालयाने एखादे फिरते चषक जिंकले असेल तर ते चषक त्या महाविद्यालयास कायमस्वरूपी प्रदान करण्यात येईल. त्यानंतर प्रायोजकांनी नवीन चषक तयार करून विद्यापीठास द्यावे.
३. सर्व फिरते चषक व अन्य सन्मानचिन्ह बक्षीस वितरण समारंभादरम्यान मुख्य रंगमंचावर प्रदर्शनासाठी ठेवण्यात येतील.
४. विजेत्या महाविद्यालयाने फिरत्या चषकांची सुरक्षित हाताळणी करावी. तसेच पुढील महोत्सवापूर्वी चषक विद्यापीठाकडे सुपूर्द करावे.

### प्रमाणपत्रे :

१. सर्व संघांना **सहभागाची इ-प्रमाणपत्रे** (e-certificate) प्रदान केली जातील.
२. सहभागी महाविद्यालयासही **सहभागाची इ-प्रमाणपत्रे** (e-certificate) दिली जातील.
३. **प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक** मिळवणाऱ्या प्रत्येक विद्यार्थी कलावंताला पारितोषिक वितरण कार्यक्रमात **गौरव प्रमाणपत्र** प्रदान केले जाईल.
४. **सर्वसाधारण विजेतेपद** जिंकणाऱ्या संघांनाही पारितोषिक वितरण कार्यक्रमात **गौरव प्रमाणपत्र** दिले जाईल.
५. सल्लागार समिती, आयोजन समिती, उपसमिती, स्वयंसेवक आणि अन्य (असल्यास) सदस्यांना **आभार प्रमाणपत्रे डिजिटल** (e-certificate) स्वरूपात दिली जातील.

### स्लॉट्स

१. उद्घाटन संमारंभानंतर विद्यापीठाद्वारे संघ व्यवस्थापकांच्या बैठकीत किंवा त्यापूर्वी प्रत्येक संघास कोड क्रमांक व प्रत्येक कलाप्रकारांच्या सादरीकरणासाठी स्लॉट्स निश्चित केले जातील.
२. सहभागी संघांनी आणि स्थळ प्रमुख, रंगमंच प्रमुख व सहाय्यकांनी दिलेल्या सादरीकरण क्रमांकाचे पालन करणे बंधनकारक आहे.

### ऑनलाइन नोंदणी

संघ/महाविद्यालयाने *केंद्रीय लोककला महोत्सवा*साठी ऑनलाइन नोंदणी करणे बंधनकारक आहे.

- नोंदणी **१० डिसेंबर २०२४ ते २० डिसेंबर २०२४** या कालावधीत पूर्ण करावी लागेल.

**i) ऑनलाईन नोंदणी पोर्टलमध्ये खालील बाबींचा समावेश आहे**

१. महाविद्यालयाची सामान्य माहिती (नाव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक, माननीय प्राचार्यांचे तपशील)
२. सांस्कृतिक समन्वयक/ पुरुष व महिला संघ व्यवस्थापकांचे तपशील
३. संघाचे तपशील
४. सहभागी कार्यक्रमांचे तपशील
५. सहभागी विद्यार्थी कलावंताचा अद्ययावत पासपोर्ट फोटो
६. सहभागी **विद्यार्थी कलावंत व सांस्कृतिक समन्वयक/ संघव्यवस्थापकांचे पासपोर्ट फोटो अपलोड** करावे.
७. **प्राचार्यांचे** कलासादरीकरणविषयक **हमीपत्र अपलोड** करणे अनिवार्य आहे.
८. डाउनलोड्स व प्रिंटआउट्स (हार्डकॉपी)

## नोंदणी कक्ष

१. रिपोर्टिंग कक्ष जिल्हानिहाय असेल.
२. नोंदणी समिती नियोजित वेळापत्रकानुसार काम सुरू करेल.
३. कागदपत्रांतील विसंगतीबाबत आयोजन समिती अध्यक्ष मा. कुलगुरू आणि आयोजन सचिव संचालक, विद्यार्थी विकास तसेच संबंधित संघप्रमुख यांना माहिती देण्यात येईल.
४. कागदपत्रांतील विसंगती, चुकीची वा खोटी माहिती आढळल्यास सहभागींना अपात्र ठरवून त्यांच्यावर **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ नुसार** कठोर कारवाई करण्यात येईल.

## आवेदन पत्रासोबत विद्यार्थी विकास विभागात सादर करावयाची कागदपत्रे :

सहभागी महाविद्यालयाच्या संघ व्यवस्थापकाद्वारे खालील कागदपत्रे सादर करावे लागतील-

१. **एकत्रित प्रपत्रांची प्रिंटआउट** (नोंदणी पोर्टलवरून डाउनलोड केलेला) (मूळ)
२. **सर्व सहभागी विद्यार्थी कलावंतांच्या फॉर्म्सचे प्रिंटआउट्स** (नोंदणी पोर्टलवरून डाउनलोड केलेले)
३. सर्व सहभागी कलावंतांचे **विद्यमान शैक्षणिक वर्षाचे ओळखपत्र** (मूळ व प्रमाणित छायाप्रत)
४. सर्व सहभागी कलावंतांचे **दहावी बोर्ड प्रमाणपत्र** (प्रमाणित छायाप्रत)
५. मागील **सत्र परीक्षा गुणपत्रिका** (प्रमाणित छायाप्रत)
६. सहभागी विद्यार्थ्यांचे हमीपत्र (मूळ) (परिशिष्ट १)
७. सहभागी विद्यार्थ्यांकडून जबाबदारी प्रमाणपत्र (मूळ) (परिशिष्ट २)
८. सहभागी विद्यार्थ्यांचे *बोनाफाईड प्रमाणपत्र* (मूळ) (परिशिष्ट ३)
९. सहभागी विद्यार्थ्यांचे *पडताळणी प्रमाणपत्र* (मूळ) (परिशिष्ट ५)
१०. प्राचार्यांचे हमीपत्र

## कार्यक्रम स्थळी कार्यक्रम प्रमुखांकडे सादर करावयाची कागदपत्रे

सहभागी महाविद्यालयाने खालील कागदपत्रे कार्यक्रमाच्या स्थळी **प्रत्येक कलाप्रकाराच्या सादरीकरणापूर्वी १० मिनिटे अगोदर कार्यक्रम प्रमुखांकडे** सादर करणे अनिवार्य आहे-

१. संबंधित कागदपत्रांवर संघाचा **संकेतांक** नमूद करावा.
२. कागदपत्रांवर **महाविद्यालय किंवा सहभागी कलावंताचे नाव** नमूद करू नये.
३. कार्यक्रम प्रमुखांद्वारे ही कागदपत्रे संबंधित कलाप्रकाराच्या **परीक्षकांना सादरीकरणाच्या वेळी** प्रदान केली जातील.

४. **क्रमांकानुसार विभाग, कार्यक्रम आणि सादर करावयाची कागदपत्रे**

| कार्यक्रम | सादर करावयाची कागदपत्रे |
|---|---|
| **लोकनाट्य** | a) लोकनाट्य संहितेच्या चार प्रती **सारांश** |
| **जलसा** | a) मराठी/ हिंदी भाषेतील **संहिता – तीन प्रती** |
| **कविता वाचन (वैयक्तिक)** | a) स्वहस्ताक्षरातील स्वलिखित कविता -**चार प्रती** |

## गुण गणना : सर्वसाधारण विजेते

**अ) वैयक्तिक (Solo) कलाप्रकार :**

- प्रथम पारितोषिकासाठी ५ **गुण**,
- द्वितीय पारितोषिकासाठी ३ **गुण**,
- तृतीय पारितोषिकासाठी १ **गुण**.

**ब) सांघिक (Group) कलाप्रकार :**

- प्रथम क्रमांकासाठी ९ **गुण**,
- द्वितीय क्रमांकासाठी ७ **गुण**,
- तृतीय क्रमांकासाठी ५ **गुण**.

- **महाराष्ट्राच्या लोककला प्रकारातील सर्व कलांचे निकाल** सर्वसाधारण विजेतेसाठी विचारात घेतले जातील.

## नोंदणी कीट

विद्यापीठाद्वारे सर्व सहभागी महाविद्यालयांना संपूर्ण संघासाठी नोंदणी कीट प्रदान करेल, ज्यामध्ये खालील गोष्टींचा समावेश असेल-

- **ओळखपत्र**
- **लोककला महोत्सव निमंत्रण पत्रिका व वेळापत्रक**
- **माहिती पुस्तिका**

## तक्रार निवारण यंत्रणा

**अ) तक्रार निवारण समिती :**

१. मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशानुसार तक्रार निवारण समिती गठित केलेली आहे. सदरील समितीकडे लेखी स्वरूपात तक्रार दाखल करता येईल.

२. **तक्रार निवारण समितीने दिलेला निर्णय तक्रारदारावर बंधनकारक असेल.**

३. कोणताही सहभागी कलावंताने **थेट तक्रार निवारण समितीच्या सदस्यांशी संपर्क न साधता संबंधित संघ प्रमुख/व्यवस्थापकांमार्फत तक्रार दाखल करावी लागेल.**

४. कोणत्याही संघाच्या सादरीकरणाविषयी आक्षेप असल्यास त्या संघाच्या सादरीकरणानंतर तात्काळ लेखी स्वरूपात आक्षेप घेण्यात यावा. विशिष्ट कलाप्रकारातील अनुक्रमे दुसरे सादरीकरण संपल्यानंतर कोणताही आक्षेप स्वीकारला जाणार नाही. उदा. 'अ' संघाच्या सादरीकरणाविषयी आक्षेप असल्यास अनुक्रमे केवळ 'ब' संघाचे सादरीकरण संपेपर्यंत वा 'क' संघाचे सादरीकरण सुरू होईपर्यंत आक्षेप घेता येईल. यानंतर आक्षेप घेता येणार नाही.

५. कोणत्याही संघाचे सादरीकरण सुरू असताना ध्वनिक्षेपक बंद झाले असता अशा परिस्थितीत परीक्षकांपर्यंत आवाज पोहोचत नसेल तर पुन्हा सादरीकरण घेण्यात येईल. (ही स्पर्धा असल्याने केवळ परीक्षकांपर्यंत स्पष्ट आवाज पोहोचणे आवश्यक आहे.)

६. निकाल जाहीर झाल्यानंतर, कोणत्याही वादाच्या बाबतीत, सहभागी संघ व्यवस्थापक तक्रार वैध स्वरूपात **तक्रार निवारण समितीला** सादर करेल. अशी **तक्रार बक्षीस वितरण समारंभानंतर एक तासाच्या आतच दाखल करावी लागेल.** त्यानंतर कोणत्याही स्वरूपात तक्रार स्वीकारली जाणार नाही.

७. त्याविषयीचा अंतिम निर्णय आयोजन समितीचा असेल, जो सर्वांवर बंधनकारक असेल.

८. जर कोणी गंभीर गैरवर्तन केले किंवा आचारसंहितेचे उल्लंघन केले, तर सहभागी महाविद्यालयातील संबंधित सदस्य/सदस्यांवर/संघावर/संघप्रमुखांवर/महाविद्यालयावर **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा-२०१६ नुसार कारवाई** केली जाईल.

# केंद्रीय लोककला महोत्सव २०२६

दि. ११ व १२ जानेवारी २०२६

## हमीपत्र

दि.    /    /

**प्रति**
**संचालक,**
विद्यार्थी विकास,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ,
**छत्रपती संभाजीनगर.**

**महोदय,**

केंद्रीय लोककला महोत्सव २०२५-२०२६ साठी आम्ही सादर करीत असलेल्या कोणत्याही कलाप्रकारात कुठल्याही प्रकारच्या भावना दुखावतील असा आशय, लेखन व सादरीकरण करणार नाही. शिवाय कुणाच्याही अस्मितेला तडा जाईल, संत व महापुरुषांचा अवमान अशा असंवैधानिक आशयाचे आमचा संघ / आमचे महाविद्यालय / विभाग कदापि समर्थन करीत नाही व आम्ही तसे करणार नाही. याची नि:संदिग्ध ग्वाही आम्ही देत आहोत आमच्या कुठल्याही सादरीकरणातून काही अनर्थ घडला, सामाजिक सौहार्द बिघडले तर त्याची सर्वस्वी जबाबदारी आमची असेल.

**प्राचार्य / संचालक**

-----------------------------------------

-----------------------------------------

------------------------------------------